अमळनेरात अतिक्रमणांनी गिळले रस्ते

समस्या ● पालिकेसह संबंधित प्रशासनाने दुर्लक्ष ● नागरिकांसह वाहनधारक त्रस्त

अमळनेर : एकीकडे जळगाव जिल्ह्यात पोलिसांकडून शून्य अपघात मोहीम राबवली जात आहे. तसेच महामार्गावरील अतिक्रमणे काढली जात आहेत. मात्र, याऊलट प्रक्रिया अमळनेरमध्ये होताना दिसत आहे. धुळे ते चोपडा राज्य मार्ग १५वर शहरात अतिक्रमण वाढायला सुरुवात झाली असून प्रशासनाचे मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे.

अमळनेर शहरात बाजार समितीपासून महाराणा प्रताप चौक, स्वामी समर्थ चौक, बसस्थानक, पाच पावली देवी चौक, तिरंगा चौक, दगडी दरवाजा, फरशी पूल आणि पैलाड भागात हळूहळू अतिक्रमण वाढत आहे. पाचपावली देवीजवळ नवीन महसूल इमारत आणि प्रशासकीय इमारत जसजशी पूर्णत्वाच्या मार्गावर येत आहे, तसतसे व्यवसायिक रस्त्याच्या दोन्ही बाजूला आपली दुकाने थाटू लागली आहेत. बोरी नदी पुलावर पाईप लाईनच्या कामामुळे एक मार्ग बंद होता, तरी दुसऱ्या मार्गावर दोन्ही कडची वाहतूक सुरु असताना दुकानदारांनी पुलावरच आपला व्यवसाय सुरु ठेवला होता. या संदर्भात पालिकेचा अतिक्रमण विभाग आता कुचकामी ठरला आहे. तर, लोकप्रतिनिधी, नगरसेवक कार्यकर्त्यांची अतिक्रमित दुकाने, हातगाड्या हटवू देत नाहीत. उलट कर्मचाऱ्यांवर दबाव आणतात. तर प्रशासन मूग गिळून बसले आहे. पुलावर पाईप लाईन टाकली म्हणून पालिकेला नोटीस देऊ पाहणारे सार्वजनिक बांधकाम खाते मात्र अतिक्रमण करणाऱ्यांना नोटीस द्यायला तयार नाही. तर, एरवी कायद्याची अंमलबजावणी करणारी पालिका मात्र उच्च न्यायालयाचे आदेश असताना ही कित्येक वर्षांपासून अंमलबजावणी करताना दिसून येत नाही. साने गुरुजी शाळेबाहेरील दुकाने न्यायालयाच्या आदेशाने जमीनदोस्त केली होती. तर इतर अतिक्रमण धारकांना मात्र वेगळा न्याय का? असा प्रश्न विचारला जात आहे.

> बोरी नदी पुलावरील आणि बसस्थानक परिसरातील नाल्यावरील अतिक्रमण हटवले जात नसतील तर किमान तेथील जागा भाड्याने देऊन रस्त्यातच बाजारपेठ उभारावी.
>
> **– एक त्रस्त अमळनेरकर नागरिक**

बसस्थानकाशेजारील अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी

बसस्थानक शेजारी रिक्षा आणि टॅक्सी स्टँड असून त्याच्या बाजूला आणखी अवैध प्रवासी वाहतूक, हातगाड्या, फळविक्रेत्यांची अतिक्रमणे झाली आहेत. बस आगाराबाहेर येताना व जाताना याचा त्रास होतो. मात्र, कोणतीच कारवाई होताना दिसत नाही. शहरात सीसीटीव्ही फुटेज असताना ही अतिक्रमणावर किंवा रस्त्यात वाहतुकीची कोंडी करणाऱ्या हातगाड्या, अवैध प्रवासी वाहनांवर कारवाई होत नाही.

> अतिक्रमण विभागाला सक्त आदेश देऊन अतिक्रमण हटवण्याची कारवाई केली जाईल. त्यांना पुन्हा एकदा आदेश देऊन जबाबदारीची जाणीव केली जाईल.
>
> **– गणेश शिंदे,** मुख्याधिकारी, अमळनेर नगरपरिषद

> बोरी नदीच्या पुलावरील दहा ते बारा विक्रेत्यांना नोटिस देण्यात आल्या होत्या. त्यांनी तात्पुरते अतिक्रमण काढून घेतले होते. आता पुन्हा पुलावर विक्रेते बसत आहेत.
>
> **– भागवत माळी,** अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

अंचल कार्यालय जळगांव
प्लॉट नं. २६४ टीपीएस III, सागरपार्क जवळ, जळगाव ४२५००१.
ई-मेल : legal_jag@mahabank.co.in | टेलीफोन : ०२५७-२२२ ५०३०

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ मधील रुल ८(६) च्या अटींनुसार स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्री सूचना.

Sale Notice No.- JALGAON/ E-bikray/2026-27

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि विशेषकरून कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या बँक ऑफ महाराष्ट्र यांच्याकडे गहाण / बोज्याअंतर्गत आहेत आणि बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी यांनी सदर मालमत्तांचा ताबा घेतला असून, सदर मालमत्तेची **''जसे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे''** आणि **''तेथे जे आहे''** या तत्वावर, बँक ऑफ महाराष्ट्र यांनी खाली नमूद केलेल्या परीशिष्टामधील कर्जदार व जामीनदार यांच्याकडून येणे असलेली कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी **दि.१६/०९/२०२६** रोजी ई-ऑक्शनद्वारे विक्री केली जाणार आहे. कर्जदार आणि जामीनदारांकडून येणे असलेल्या रकमेचा तपशील, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावरील माहिती असलेला बोजा, ताब्याचा प्रकार, राखीव किंमत, बयाणा रक्कम आणि बोली वाढविण्याची रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	शाखेचे नाव/पत्ता आणि कर्जदार/ जामीनदाराचे नांव आणि पत्ता	एकूण येणे रक्कम (रु.)	मालमत्तेचा तपशील	राखीव किंमत (लाखांत) / बयाणा रक्कम (लाखांत) / बोली वाढविण्याची रक्कम प्रत्यक्षात
	चोपडा शाखा			
१.	**कर्जदार : श्री. कुलदीप संजयकुमार पाटील** राहणार : ३०/अ,जोगेश्वरी, पंकज नगर, चोपडा, जिल्हा– जळगाव (महा) **जामीनदार : श्री. शशिकांत एकनाथ शिसोदे** राहणार : ३४, संजीवनी नगर, यावल रोड, चोपडा, जिल्हा– जळगाव (महा)	**रु. २२,६९,३०९.००** **(रु. बावीस लाख एकोणसत्तर हजार तीनशे नऊ)** **अधिक दंडात्मक व्याज व इतर आकर / खर्च**	प्लॉट नं. २०, सीटीएस नं. ६०११/ए, सर्वे नं. ९९४/१, विद्या विहार कॉलनी नगर जवळ, चोपडा, ता. चोपडा जळगाव (महाराष्ट्र) येथील प्लॉट चे अंगीकृत भाग. प्लॉट चे क्षेत्रफळ – १५०.०० चौ.मी. (मालक: श्री. शशिकांत एकनाथ शिसोडे) अंगीकृत भाग.**चतु:सीमा उत्तर :** प्लॉट नं. ९ **दक्षिण:** रस्ता **पूर्व :** प्लॉट नं. १९ **पश्चिम :** प्लॉट नं. २१ ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु. २२.६० लाख / ईएमडी रु. २.२६ लाख / वाढ रु.२०,०००
२.	**कर्जदार : १. मे जनसेवा हॉस्पिटल प्रो.डॉ.चंद्रकांत जामसिंग बारेला** प्लॉट नंबर ६३, बेसमेंट शॉप नंबर १,२ आणि ३, नारायणवाडी, आणि पहिला मजला, शिरपूर चोपडा रोड जवळ, चोपडा, ता.चोपडा जि. जळगाव. ४२५१०७. **कर्जदार/जामीनदार : २. डॉ. चंद्रकांत जामसिंग बारेला ३. डॉ. सोनाली चंद्रकांत बारेला** दोन्ही राहणार दुसरा मजला, प्लॉट क्र.६३, सीटीएस क्र.६०२७ नारायणवाडी, शिरपूर–चोपडा रोडजवळ, चोपडा, ता.चोपडा जि. जळगाव –४२५१०७.	**१. मे. जनसेवा रुग्णालय – देय रक्कम रु. १,०३,७३,२६१.९० (एक कोटी तीन लाख त्र्याहत्तर हजार दोनशे एकसष्ट आणि नव्वद पैसे + अधिक त्यावरील भविष्यातील लागून केलेले व्याज दि.११.११.२०२५ पासून च्या मासिक येण्यासहीत अधिक दंडात्मक व्याज व इतर आकार / खर्च २. डॉ. चंद्रकांत जामासिंग बरेला आणि डॉ. सोनाली चंद्रकांत बरेला – गृहकर्ज देय रक्कम रु. २७,८२,२७९.०६ (सत्तावीस लाख ब्याऐंशी हजार दोनशे एकोणऐंशी आणि सहा पैसे फक्त) + अधिक त्यावरील भविष्यातील लागून केलेले व्याज दि.११.११.२०२५ पासून च्या मासिक येण्यासहीत अधिक दंडात्मक व्याज व इतर आकार / खर्च एकूण देय रक्कम रु. १,३१,५५,५४०.९६ (एक कोटी एकतीस लाख पंचावन्न हजार पाचशे चाळीस आणि शहाण्णव पैसे फक्त + अधिक त्यावरील भविष्यातील लागून केलेले व्याज दि.११.११.२०२५ पासून च्या मासिक येण्यासहीत अधिक दंडात्मक व्याज व इतर आकार / खर्च**	सर्वे क्रमांक ९८१/बी, गट क्रमांक ११४८ मधील प्लॉट क्रमांक ६३, सीटीएस क्रमांक ६०२७ येथे बांधलेली जमीन, रुग्णालयाची इमारत. तळघरातील दुकान क्रमांक १, २ आणि ३, स्टिल्ट तळमजल्यावरील दुकान क्रमांक १, २ आणि ३, व्यावसायिक पहिला मजला आणि निवासी दुसरा मजला, नारायणवाडी, शिरपूर चोपडा रस्त्याजवळ, चोपडा. जमिनीचे क्षेत्रफळ १४६.२५ चौ. मीटर. प्लिंथ क्षेत्रफळ – तळघर २८.३० चौ. मीटर, तळमजला – २८.३० चौ. मीटर, पहिला मजला – ५८.६७ चौ. मीटर आणि दुसरा मजला – ५८.६७ चौ. मीटर. **सीमा: उत्तर:** ६.०० मीटर रुंद रस्ता, **दक्षिण:** मोकळी जागा **पूर्व:** प्लॉट क्रमांक ६२ **पश्चिम:** प्लॉट क्रमांक ६४. ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु.१,५३,६२,१००/– / ईएमडी रु.१५,३६,२१०/– / वाढ रु.२०,०००
			मालमत्ता क्र. २ प्लॉट क्र. ६२, सर्व्हे क्र. ९८१/बी, सीटीएस क्र. ६०२७, जनसेवा रुग्णालया जवळ, नारायणवाडी, शिरपूर–चोपडा रस्त्याजवळ, चोपडा, क्षेत्रफळ १४६.२५ चौरस मीटर. **सीमा : उत्तर :** रस्ता **दक्षिण :** मोकळी जागा **पूर्व :** प्लॉट क्रमांक ६१ **पश्चिम :** प्लॉट क्रमांक ६३ ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु.३९,४९,२००/– / ईएमडी रु.३,९४,९२०/– / वाढ रु.२०,०००
	बांभोरी शाखा			
१.	**कर्जदार : मे. ऋषिकेश फर्निचर, प्रो. श्री. रावसाहेब काडू पाटील** पो. अव्हाणे, ता. धरणगाव, जि. जळगाव.	**रु. ३८,६५,१६७.००/–** **(अठ्तीस लाख पासष्ट हजार एकशे सदुसष्ट)** **अधिक दंडात्मक व्याज व इतर आकार / खर्च**	अव्हाणी, ता. धरणगाव, जि. जळगाव येथील ग्रामपंचायत घर क्र. १६८, गावठाण परिसरातील संपूर्ण मालमत्ता. भूखंड क्षेत्रफळ ८३.६१ चौ. मी. **चतु:सीमा : पूर्व –** जी.एच. क्र. १६७, **पश्चिम –** जी.एच. क्र. १६९, **उत्तर –** रस्ता, **दक्षिण –** जी.एच. क्र. १७४. ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु.१६.५५ लाख / ईएमडी रु. ७७,६७०/– / वाढ रु.२०,०००
२.	**मेसर्स : कावेरी गृह उद्योग कर्जदार : प्रो. श्रीमती अनुराधा** पोस्ट आव्हाणे येथे कावेरी महिला गृह उद्योग ता.धरणगाव जि.जळगाव **जामीनदार : १.अधिकार दिलीप पाटील** पोस्ट आव्हाणे ता.धरणगाव जि.जळगाव **२.कडू बाजीराव पाटील** पोस्ट आव्हाणे ता.धरणगाव जि.जळगाव	**रु. ८,३३,८२०.००** **(रु. आठ लाख तेहतीस हजार आठशे वीस)** **अधिक दंडात्मक व्याज व इतर आकार / खर्च**	अव्हाणी, ता. धरनगाव, जि. जळगाव येथील गावठाण परिसरातील ग्रामपंचायत घर क्र. १४५ मधील सर्व भूखंड . क्षेत्रफळ ७५.०२ चौ. मीटर. **मालक :** अधिकार दिलीप पाटील **चतु:सीमा – पूर्व –** जी.एच. क्र. १४४ **पश्चिम –** रस्ता **उत्तर –** रस्ता **दक्षिण –** ग्रा.ग.नं, १४६ ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु. २,३६,७००/– / ईएमडी रु. २३,६७०/– / वाढ रु.२०,०००
	चाळीसगाव शाखा			
१.	**केके इंडस्ट्रीज कर्जदार : प्रो. श्रद्धा गौतम ढोले उर्फ श्रीमती श्रध्दा भरतकुमार कदम** कार्यालय येथे : एम आयडीसी प्लॉट क्र.ए – २/४१, खडकी चाळीसगाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव **हमीदार : भारतकुमार नामदेव कदम** प्लॉट क्र.२२, म्हाडा कॉलनी, आयटीआय करगाव, ता. चाळीसगाव, जिल्हा जळगाव.	**रु.२५११८७७.००** **(रु. पंचवीस लाख अकरा हजार आठशे सत्याहत्तर)** **अधिक दंडात्मक व्याज व इतर आकार / खर्च**	एमआयडीसी खडकी बु., ता. चाळीसगाव, जिल्हा चाळीसगाव मधीलप्लॉट क्र. ए – २/४१ येथील जमीन आणि इमारत. **मालक :** केके इंडस्ट्रीज, **मालक** श्रध्दा गौतम ढोले मार्फत ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु. १६.५३ लाख / ईएमडी रु. १.६५ लाख / वाढ रु. ०.२० लाख
२.	**कर्जदार : श्री. शुभंम राजेंद्र पाटील आणि श्रीमती अर्पिता शुभंम पाटील** दोघ राहणार येथे : गणेशपूर, ता. चाळीसगाव, जि. जळगाव– ४२४१०१	**रु. ११,०५,६९१.००** **(रु. अकरा लाख पाच हजार सहाशे एक्याण्णव मात्र)** **अधिक दंडात्मक व्याज व इतर आकार / खर्च**	फ्लॅट क्र. ए – ४०६, ४ था मजला, स. क्र. ४२१/१, प्लॉट क्र. ८ ते १७, कृष्णा वर्ल्ड सीटी, डी जे देशमुख नगर, चाळीसगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव – ४२४१०१. **मालकाचे नाव :** १. शुभंम राजेंद्र पाटील आणि अर्पिता शुभंम पाटील ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु. ११.४३ लाख / ईएमडी रु. १.१४ लाख / वाढ रु. ०.२० लाख
३.	**कर्जदार : श्री. शुभंम राजेंद्र पाटील आणि श्रीमती अर्पिता शुभंम पाटील** दोघ राहणार येथे : गणेशपूर, ता. चाळीसगाव, जि. जळगाव– ४२४१०१	**रु. ११,३६,२५२.००** **(रु. अकरा लाख छत्तीस हजार दोनशे बावन्न मात्र)** **अधिक दंडात्मक व्याज व इतर आकार / खर्च**	फ्लॅट क्र. ए – ४०५, ४ था मजला, स. क्र. ४२१/१, प्लॉट क्र. ८ ते १७, कृष्णा वर्ल्ड सीटी, डी जे देशमुख नगर, चाळीसगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव – ४२४१०१. **मालकाचे नाव :** १. शुभंम राजेंद्र पाटील आणि अर्पिता शुभंम पाटील ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु. ११.४३ लाख / ईएमडी रु. १.१४ लाख / वाढ रु. ०.२० लाख
	जळगाव शहर शाखा			
१.	**कर्जदार : दिपेश संजय विसपुते** पत्ता : प्लॉट नंबर ०४, गेट नंबर २०१/२, स्वराज्य नगर, कोल्हे हिल्स जवळ, सावखेडा जळगाव (म. रा.) ४२५००१ **हमीदार–टॉप अप कर्ज आणि पीएल कोविड –१९ विनोद दिलीप शिंपी** पत्ता : प्लॉट नंबर १, किरण भवन, कांचन नगर, पांडे चौक, असोदा रोड जळगाव, ४२५००१ **गॅरेंटर – हाऊसिंग लोन : मोहनदास रोचलदास ओचानी** पत्ता : प्लॉट नं ०७, सिंधी कॉलनी रोड, कला भवन जवळ, जळगाव ४२५००१ आणि **ममता टेलर (प्रोप्रा. श्री. दिपेश संजय विसपुते)** पत्ता : प्लॉट नंबर ०४, गेट नंबर २०१/२, स्वराज्य नगर, कोल्हे हिल्स जवळ, सावखेडा जळगाव (म. रा.) ४२५००१	रु. १५,१७,८५१/– (रु. पंधरा लाख सतरा हजार आठशे एकावन्न फक्त) + २९/०८/२०२३ पासून १०.३०% दराने (मासिक चक्रवाढ व्याजासह) न आकारलेले व्याज + दंडात्मक व्याज आणि इतर शुल्क/खर्च ममता टेलर यांच्या खात्यासाठी : रु. ३,९३,७२७/– (रु. तीन लाख त्र्याण्णव हजार सातशे सत्तावीस) + २०/१०/२०२३ पासून १०.७०% दराने (मासिक चक्रवाढ व्याजासह) न आकारलेले व्याज + दंडात्मक व्याज आणि इतर शुल्क/खर्च	मौजे सावखेडा बु. शिवार, तालुका व जिल्हा जळगाव – ४२५००१ येथील गट क्र. २०१/२ मधील प्लॉट क्र. ४ चा मध्यभाग, म्हणजेच ब्लॉक क्र. ०२'; मोजमापित २१६.०० चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या प्लॉट क्र. ४ पैकी ५८.१४ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंडाचे सर्व अंगीकृत भाग. ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु. १४.९५ लाख / ईएमडी रु. १.४९ लाख / वाढ रु. ०.२० लाख
२.	**कर्जदार : किशोर साहेबराव सपकाळे** पत्ता: प्लॉट नंबर ३०, ब्लॉक नंबर १, गट नंबर २६, चंदू अण्णा नगर, निमखेडी शिवार, जळगाव, (म.रा.) – ४२५३०६. **हमीदार : श्री संतोष भिका सोनवणे** पत्ता: ऑपरेटर, एएसइटीसीएल (जुनी एमआयडीसी), जळगाव, (म.रा.) – ४२५००३.	रु. ७,२६,४६५.०० (रुपये सात लाख सव्वीस हजार चारशे पासष्ठ फक्त) + ११/१०/२०२५ पासून १०.५०% दराने (मासिक चक्रवाढ व्याजासह) न आकारलेले व्याज + दंडात्मक व्याज आणि इतर शुल्क/खर्च.	प्लॉट क्र. ३०, ब्लॉक क्र. १, गट क्र. २६, झोन क्र. ९/२९९, प्लॉटचे क्षेत्रफळ – ४२१.८४ चौ. फूट, बांधकामाचे क्षेत्रफळ – २६२.६४ चौ. फूट. चंदू अण्णा नगर, निमखेडी शिवार, तालुका व जिल्हा – जळगाव – ४२५००२. ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु. १०.१८ लाख / ईएमडी रु. १.०१ लाख / वाढ रु. ०.२० लाख
३.	**कर्जदार : किरण त्रंबक पाटील** पत्ता : वझरखडे, पोस्ट वरणगाव तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव – ४२५३०५ **सह–अर्जदार : रवींद्र त्र्यंबक पाटील** पत्ता : वझरखडे, पोस्ट वरणगाव तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव – ४२५३०५ **सह–अर्जदार : शीतल किरण पाटील** पत्ता; वझरखडे, पोस्ट वरणगाव तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव – ४२५३०५	रु. १२,१४,५७९/– (रुपये बारा लाख चौदा हजार पाचशे एकोणऐंशी) + ३०/११/२०२३ पासून ८.४०% दराने (मासिक चक्रवाढ व्याजासह) आकारले न गेलेले व्याज + दंडात्मक व्याज आणि इतर शुल्क/खर्च.	सेंट्रल ब्लॉक, ब्लॉक क्र. १४सी, प्लॉट क्र. १४ (मध्य भाग), सर्व्हे क्र. ११/२, एफ.पी. क्र. ४४सी, टी.पी.एस. क्र. ०२; भूखंडाचे क्षेत्रफळ – ८९.९२ चौ.मी., बांधकामाचे क्षेत्रफळ – ४८.०६ चौ.मी.; सातारे शिवार, तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव ४२५२०१. ● **प्रतिकात्मक ताबा** ● बँकेला माहित असलेला बोजा - नाही	आरपी रु. १८.९९ लाख / ईएमडी रु. १.८९ लाख / वाढ रु. ०.२० लाख

१) सर्व मालमत्तांची विक्री ऑनलाईन पध्दतीने **https://baanknet.com/eauction-psb** या वेबसाइटवर, (संपर्क क्रमांक ८२९१२२०२२०, ई-मेल : **support.BAANKNET@psballiance.com**) **दि. १६/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० पर्यंत** भारतीय प्रमाणवेळ, प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह करण्यात येईल. बयाणा रक्कमेसहीत बोली/निविदा सादर करण्याची अंतिम तारीख **दि. १५/०९/२०२६** सायं. ५.०० पर्यंत आहे. इच्छुक खरेदीदार मालमत्तांची पाहणी भेटीच्या पूर्वनियोजित वेळेनुसार **दि. २९/०८/२०२६ ते दि. ११/०९/२०२६ पर्यंत १२.०० ते ४.०० दरम्यान स्वखर्चाने करू शकतात.** पूर्वनियोजित भेटीच्या वेळेसाठी कृपया संबंधित शाखेशी संपर्क साधावा. **मो. ९४०५७९९३९७ / ९४२२७८४२२७ / ७९०५१७९९१३ / ८०८७०५२९३२** प्रस्तावक ऑनलाईन बिडींग दरम्यान मालमत्तांची बोली वर नमूद केल्यानुसार वाढवू शकतात.

२) विक्रीच्या तपशीलवर अटी आणि शर्तीसाठी कृपया बँकेच्या वेबसाईटवरील लिंक **''http://www.bankofmaharashtra.in/ properties_for_sale'** आणि ई-विक्री पोर्टल : **(https://baanknet.com/eauction-psb)** पहावी.

दिनांक : २८/०८/२०२६
ठिकाण : जळगाव

टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य.

अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ महाराष्ट्र

चोरट्या वाळू वाहतुकीवर ग्रामीण पोलिसांचा छापा; १० लाखांचा डंपर जप्त

चाळीसगाव : भडगावकडून चाळीसगावकडे चोरट्या पद्धतीने वाळूची वाहतूक करणाऱ्या डंपरवर चाळीसगाव ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली. हिंगोणे गावाजवळील वडाळा-वडाळी रस्त्यावरील चौकाजवळ ही कारवाई करुन पोलिसांनी सुमारे १० लाखाचा डंपर आणि २४ हजाराची अंदाजे सहा ब्रास वाळू असा एकूण १० लाख २४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी डंपर चालकाला ताब्यात घेतले आहे.

२७ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी विजय माळी यांना एका डंपरमधून चोरटी वाळू वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पो.कॉ. राहुल महाजन, पो.हे.कॉ. प्रवीण सपकाळे व पो.कॉ. बाळू बावीस्कर यांच्या पथकाने हिंगोणे गावाजवळील चौफुली परिसरात सापळा रचला. सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास भडगावकडून टाटा कंपनीचा डंपर येताना पोलिसांना दिसला. संशय आल्याने पोलिसांनी वाहन थांबवले. डंपरची पाहणी केली असता त्यामध्ये वाळू भरलेली आढळली. डंपर चालकाकडे वाळू वाहतुकीचा परवाना व गौण खनिजासंदर्भातील कागदपत्रांची चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. चालकाने आपले नाव दीपक शांताराम कोळी (वय २७, रा. पाटणादेवी रोड, हरगिर बाबा नगर, चाळीसगाव) असे सांगितले. पोलिसांनी त्याला डंपरसह चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात आणले. पंचांसमक्ष वाहन व वाळूची पाहणी करून पंचनामा करण्यात आला. या कारवाईत टाटा कंपनीचा अंदाजे १० लाखाचा डंपर (एमएच- १५, डीके- ५०४०), २४ हजारांची अंदाजे सहा ब्रास वाळू असा एकूण १० लाख २४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सात्री येथे शिक्षकांच्या घरातून पावणेचौदा लाखांचे दागिने लंपास

घरात लोक असतानाही किल्ली चोरून लांबवले दागिने

अमळनेर : अज्ञात व्यक्तीने घरातील कपाटाची किल्ली चोरून घरातल्या व्यक्तींच्या अपरोक्ष शिक्षकाच्या घरातील १३ लाख ७८ हजार ७५८ रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना २ ते २६ ऑगस्ट दरम्यान तालुक्यातील सात्री येथे घडली.

सात्री येथील राकेश सुभाष बोरसे हे अमळगाव येथे शिक्षक आहेत. २ ऑगस्टला त्यांची आई लहान भावाकडे पुण्याला गेली. त्यावेळी त्यांनी घराच्या कपाटाच्या तिजोरीची किल्ली गादी खाली ठेवली होती. तर, १७ ऑगस्टला त्यांची आई पुण्याहून परत आली. १८ ऑगस्टला राकेश जळगाव जाण्यासाठी निघाले, तेव्हा कपाटातील पाकीट काढायला गेला असता गादी खाली किल्ली सापडली नाही. त्यामुळे राकेश बोरसे यांनी २४ रोजी किल्ली बनवणारा आणून कपाट उघडले. त्यावेळी तिजोरीतील सोन्याच्या दागिन्यांचे बॉक्स जसेच्या तसे होते. २६ रोजी राकेश बहिणीकडे जाणार म्हणून त्याने आईकडे अंगठी, चेन मागितली. परंतु, कपाटात ठेवलेल्या एकाही बॉक्समध्ये काहिच नव्हते, तर सर्व दागिने गायब झालेले दिसले. कपाटातील २ लाख ५७ हजाराची १५.७८० ग्रॅमची सोन्याची चेन, ६ लाख ४४ हजार ८९९ रुपयांची ३८.६७० ग्रॅमची गळ्यातील माळ, १ लाख ९३ हजार १२० रुपयांचे ११.५८० ग्रॅमचे पेंडल, ७९ हजार ५९९ रुपयांची ५.०३० ग्रॅमची अंगठी, १ लाख ५२ हजार ३९७ रुपयांचा ११.८०० ग्रॅमचा नेकलेस, २१ हजार ३६८ रुपयांचे १.५८० ग्रॅमची कानातली बाळी, २७ हजार ३१९ रुपयांची २.०२० ग्रॅमची अंगठी व २७०० रुपये असलेले एटीएम कार्डसह पाकीट असा एकूण १३ लाख ७८ हजार ७५८ रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी राकेश बोरसे यांच्या फिर्यादीवरून मारवड पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला. एपीआय साजिद मन्सूरी, पीएसआय विनोद पवार यांनी पंचनामा केला.

सासूने जावयाला किडनी दान करुन मुलीच्या सौभाग्याचे केले रक्षण

अमळनेर : सासूने दोन्ही किडन्या फेल असल्याने डायलिसिसवर असलेल्या आपल्या जावयाला स्वतःची किडनी देऊन जावयाचे प्राण वाचवले आहेत.

अमळनेर येथील रहिवासी असलेल्या सेवानिवृत्त न्यायाधीश गुलाबराव पाटील व त्यांच्या पत्नी सुशीलाबाई यांच्या कन्या कविता यांचा विवाह म्हसावद येथील ॲड. अतुल रमेश चव्हाण यांच्याशी झाला होता. कविता चव्हाण या नाशिक ग्राहक न्यायालयात न्यायाधीश आहेत, तर जावई अतुल चव्हाण एका नामांकित कंपनीत कायदेशीर सल्लागार म्हणून काम करतात. दरम्यान, दोन वर्षांपूर्वी ॲड. अतुल चव्हाण यांना आजाराने ग्रासले. यामुळे त्यांच्या दोन्ही किडन्या फेल झाल्यात. टप्प्याटप्याने डायलिसिस केले जात होते. यामुळे दोन्हीकडील कुटुंबीय अस्वस्थ होते. तर, किडनी बदलण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यासाठी दाता मिळणे अवघड होते, अन् मिळालाच तर किडनी मॅच व्हायला हवी, अशा विचारांनी कुटुंबीय खचले होते. दरम्यान, सुशीलाबाईंनी धाडस केले अन् एका किडणीवर आपण जगू शकतो. अन्, एक किडनी दिली तर जावयाचे प्राण वाचवून मुलीला न्याय देऊ शकतो, म्हणून त्यांनी किडनी दान करण्याचा निर्णय घेतला.

मुलीचे सौभाग्य ठेवले कायम

● नाशिक येथील नाईन पर्स हॉस्पिटलमधील डॉक्टरांकडे या संदर्भात इच्छा व्यक्त करण्यात आली. त्यानंतर दोघांची चाचणी घेण्यात आली. यात सासुबाईची किडनी मॅच झाली. त्यानंतर एक किडनी काढून जावई ॲड. अतुल चव्हाण यांना त्यांनी किडनी दान केली. मुंबईचे तज्ज्ञ डॉक्टर अमोलकुमार पाटील व डॉ नागेश आघोर व इतर डॉक्टरांनी ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. सासूने जावयाचे प्राण वाचवून मुलीचे सौभाग्य कायम ठेवल्याने समाजासह नातेवाईकांकडून सुशिलाबाईंवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.